**नियमित दिवाणी दावा क्र.८/२०१३**

## (आदेश निशाणी ३८ खाली)

१. दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश १ क्रम १० नुसार प्रस्तुत दाव्यात प्रतिवादी म्हणून समाविष्ट करुन घेण्यात यावे यासाठी हरी रामचंद्र डोके या त्रयस्त इसमाने प्रस्तुतचा अर्ज सादर केला आहे.

२. **त्रयस्त इसमाचे संक्षिप्त कथन खालीलप्रमाणेः**

वादीने दावामिळकतीचे सरस निरस मानाने वाटप होवून विभक्त ताबा मिळावा मिळावे यासाठी प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे. पंढरपूर येथील दावामिळकत नगर भुमापन क्र. ७७ क्षेत्र १ हे. ४५आर च्या राजस्व अभिलेखात त्रयस्त इसम हरी रामचंद्र डोके याचे नाव कब्जेदार सदरी आहे. त्याची दावामिळकतीमध्ये मालकी हक्काने कब्जेवहिवाट आहे. त्यामुळेच प्रस्तुत दाव्यामध्ये त्याचे हित संबंध असून त्यास प्रतिवादी म्हणून वादपत्रात समाविष्ट करणे आवश्यक आहे. त्यामुळेच दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश १ क्रम १० नुसार प्रस्तुत दाव्यात प्रतिवादी म्हणून समाविष्ट करुन घेण्यात यावे यासाठी हरी रामचंद्र डोके या त्रयस्त इसमाने प्रस्तुतचा अर्ज सादर केला आहे.

३. **वादीतर्फे म्हणणे संक्षीप्त स्वरुपातः-**

अर्जातील मजकुर खोटा व चुकीचा आहे. प्रस्तुत त्रयस्त इसमाचा दावामिळकतीमध्ये कसलाही हित संबंध नाही. त्यामुळेच प्रस्तुत इसमाला प्रतिवादी म्हणून वादपत्रात समाविष्ट करणे आवश्यक नाही. तसेच त्रयस्त इसमास वादपत्रात समाविष्ट न केल्यास त्याचा निकालावर कसलाही परिणाम होणार नाही. त्यामुळेच अर्ज नामंजुर करण्यात यावा.

४. प्रकरणाची कागदपत्रे अभ्यासली. त्रयस्त इसमातर्फे विद्वान वकील श्री. सी.डी. झांबरे व वादी यांचे विद्वान वकील श्री. के.एम. घाडगे यांचा युक्तिवाद ऐकला. प्रकरणाची वस्तुस्थिती पाहता खालील मुद्दे निश्चित करण्यता येतात. त्यावर मी माझे निष्कर्ष खालील कारणांद्वारे नोंदवत आहे.

| | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | अर्ज निशाणी ३८ मंजुर करुन त्यामध्ये नमूद केल्यप्रमाणे दुरुस्ती करुन मिळण्यास वादी पात्र आहे का ? | .. | **''होकारार्थी''** |
| २. | काय आदेश व हुकूमनामा ? | ... | **अंतीम आदेशाप्रमाणे** |

**<u>का र णे मि मां सा</u>**

**<u>मुद्दा क्र. १ साठीः</u>**

**५.** पंढरपूर येथील दावामिळकत नगर भुमापन क्र. ७७ क्षेत्र १ हे. ४५आर च्या राजस्व अभिलेखाचे अवलोकन केले असता त्याच्या कब्जेदार सदरी त्रयस्त इसम हरी रामचंद्र डोके याचे नाव नमुद असल्याचे दिसते. तसेच इतरही अठरा व्यक्तींची नावे या मिळकतीच्या कब्जेदार सदरी असल्याचे दिसून येते. महत्वाचे म्हणजे या अठरा व्यक्तींना प्रतिवादी म्हणून वादपत्रात समाविष्ट करावे यासाठी वादीनेच निशाणी ४१ हा अर्ज सादर केलेला असून उपरोक्त नमुद व्यक्तींना याबाबत नोटीसा पाठविण्यात आलेल्या आहेत. सबब प्रकरणाची वस्तुस्थिती पाहता त्रयस्त इसम हरी रामचंद्र डोके हा प्रस्तुत दाव्याचा योग्य न्यायनिर्णय होण्यासाठी आवश्यक पक्षकार आहे असे दिसते. त्यामुळेच दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश १ क्रम १० नुसार सदर अर्जदारास प्रतिवादी म्हणून वादपत्रात समाविष्ट करुन घेण्यात यावे, असा आदेश वादींना देणे न्यायसंगत राहील. त्यामुळे मी मुद्दा क्र. १ चे उत्तर ''होकारार्थी'' देतो.

**<u>मुद्दा क्र. २ साठीः</u>**

**६.** मुद्दा क्र. १ चे होकारार्थी निष्कर्ष पाहता अर्ज मंजुर करणे न्यायसंगत राहील. त्यामुळे मी मुद्दा क्र. २ चे उत्तर खालील प्रमाणे देत आहे.

**आदेश**

१ अर्ज निशाणी ३८ मंजुर करण्यात आला.

२ त्रयस्त इसम हरी रामचंद्र डोके याला दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश १ क्रम १० नुसार प्रतिवादी क्र. १६ म्हणून वादपत्रात समाविष्ट करण्यात यावे.

३ वादींनी दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश ६ क्रम १७ नुसार वादपत्रात दुरुस्ती करुन दुरुस्त वादपत्र सादर करावे.

४ दोन्ही पक्षांनी आपआपला खर्च सोसावा.

दिनांकः ०९.०३.२०१७

(हे भा सिरसाळकर )

**दिवाणी न्यायाधीश व स्तर, पंढरपूर**

# CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file order is same word to word as per the original order

a) Name of Jr. Clerk : A.K. B. Shaikh

b) Court : C.J.S.D. Court Pandharpur

c) Order signed by P. O. : 09/03/2017

d) Order uploaded on : 10/03/2017